आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (Maharashtra Agribusiness Network -MAGNET) प्रकल्पासाठी (राज्य हिस्सा व बाह्य हिस्सा) नवीन लेखाशिर्ष देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः कृपमं १२२० /प्र.क्र.२५२/२१-स**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १९ एप्रिल, २०२१

**वाचा :-**

शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. कृपमं०११८/प्र.क्र.१३/२१-स दि.३०.०९.२०२०.

**प्रस्तावना :-**

आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पाची (Maharashtra Agribusiness Network -MAGNET) राज्यात अंमलबजावणी करावयाची आहे. सदर प्रकल्पाच्या ६ वर्ष कालावधी करीता एकूण US $ १४२.९ दशलक्ष (सुमारे रु. १००० कोटी) इतक्या रक्कमेचा असून त्यापैकी ७०% निधी (US $ १०० दशलक्ष) आशियाई विकास बँकेकडून कर्ज स्वरुपात व ३०% निधी (US $ ४२.९ दशलक्ष) राज्य शासनाच्या स्व-निधीतून असेल. सदर योजनाकरीता राज्य हिस्सा व बाह्य हिस्सा असे दोन स्वतंत्र नवीन लेखाशीर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (Maharashtra Agribusiness Network -MAGNET) प्रकल्पाकरीता राज्य हिस्सा व बाह्य हिस्सा असे दोन स्वतंत्र नवीन लेखाशीर्ष उघडण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| मराठी लेखाशिर्ष | इंग्रजी लेखाशिर्ष |
|---|---|
| मागणी क्र.व्ही ३<br>४४३५-इतर कृषिविषयक कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>(०१), पणन आणि गुणवत्ता नियंत्रण<br>(१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका<br>(०१)(०१)आशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट)<br>(राज्य हिस्सा ३०%) (४४३५ ००४८)<br>५४-गुंतवणूका | Demand no –V3<br>4435-Capital Outlay on other Agriculture Programmes<br>01-Marketing and Quality Control<br>190- Investments in public sector and other undertakings<br>(01)(01) Asian Development Bank Aided Maharashtra Agri Business Network Project (Magnet) ( State Share 30%) (4435 0048)<br>54 Investment |

| | |
|---|---|
| मागणी क्र.व्ही ३<br>४४३५-इतर कृषिविषयक कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>(०१), पणन आणि गुणवत्ता नियंत्रण<br>(१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका<br>(०१)(०२)आशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट)<br>(बाह्य हिस्सा ७०%) (४४३५ ००५७)<br>५४-गुंतवणूका | Demand no –V3<br>4435-Capital Outlay on other Agriculture Programmes<br>01-Marketing and Quality Control<br>190- Investments in public sector and other undertakings<br>(01)(02) Asian Development Bank Aided Maharashtra Agri Business Network Project (Magnet) ( External Share 70%) (4435 0057)<br>54 Investment |

२. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १४/१४३१ दि.१९.०१.२०२१ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. अनौसं क्र. ९५/२०२१-व्यय २ दि.१५.०३.२०२१ अन्वये व मा. महालेखापाल, मुंबई यांच्या पत्र क्र ख.वि.चा-१/सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग/ यूओआर-५८/२०२०-२१/४०३ दि.०९.०२.२०२१ मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०४१९११५५३४८३०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jayant Baliram Bhoir

Digitally signed by Jayant Baliram Bhoir
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Cooperation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=83d0042c0e9359bdcf6bcdffe82cd5d5d1ecef5806f973abcb61a87 6151e3c13, serialNumber=33432a8e2e81dcab0518d2a6ca4f4f1d3dba7ca3247657527f 52bef2a2aa29b2, cn=Jayant Baliram Bhoir
Date: 2021.04.19 12:02:54 +05'30'

**( जयंत भोईर )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. प्रधान सचिव ( पणन ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२. उप सचिव ( पणन ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
३. महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई
४. महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. सर्व कोषागार अधिकारी,
७. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
८. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

९. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प, पुणे

१०.कक्ष अधिकारी (१७-स),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

११.कक्ष अधिकारी/अवर सचिव (व्यय २,अर्थसंकल्प-१३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२.कक्ष अधिकारी (कार्यासन १४३१) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३. निवडनस्ती.